पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११० १८
आरोग्य मुख्य कार्यालय
Email-healthho@pcmcindia.gov.in Website –www.pcmcindia.gov.in
फोन नं. ०२०-६७३३३३३३ विस्तारीत क्रमांक – १३३६

## जाहिर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशान भूमीमध्ये अंत्यविधीकरिता लाकडांचा वापर केला जातो.

अंत्यविधीकरिता लाकडा एवजी ब्रिकेटसचा (Briquettes) वापर केलेस वृक्षतोडीस आळा बसून पर्यायाने पर्यावरणाची हानी टळेल तसेच राखेचे प्रमाण कमी होवून वेळेत व खर्चात हि बचत होऊ शकेल याकरिता पिंपरी चिंचवड मनपाचे चिंचवड- लिंकरोड,भोसरी व निगडी स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीकरिता लाकडा ऐवजी ब्रिकेटस (Briquettes) बनवणा-या संस्थांना स्मशानभूमीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याचे विचाराधीन आहे. अशा संस्था अथवा त्यांचे प्रतिनिधी मार्फत ब्रिकेटसची (Briquettes) विक्री करणेकामी इच्छूक संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहे.

उपरोक्त कामासाठी अर्ज करण्याकरिता खालील अटींची पुर्तता करणेबंधनकारक राहील.

१) सदर स्मशानभूमीमध्ये ब्रिकेटसमध्ये अंत्यसंस्कार करण्यासाठी सद्यस्थितीतील लोखंडी मांगाडा/माचा यामध्ये करावयाचा बदल संस्थेने करावयाचा आहे.

२) ब्रिकेटसमध्ये अंत्यसंस्कार करताना त्याबाबत स्वंतत्र अद्यावत नोंद रजिस्टर ठेवून,त्यामध्ये प्रत्येक अंत्यविधीची नोंद घेणेत यावी तसेच अत्यंविधी करिता आलेल्या मृतदेहाचे वजन,त्याकरिता वापरणेत आलेले ब्रिकेटसचे वजन यांची नोंद घेणेत यावी.

३) अंत्यविधी करिता ब्रिकेटसचा वापर करणेबाबत नागरिकांना आवाहन करणेसाठी कंपनीमार्फत जाहिरात फलक लावणेत यावा.

४) अंत्यविधी करिता ब्रिकेटसचा वापर करणे हे कोणत्याही नागरिकांवर/मृतांच्या नातेवाईकांवर बंधनकारक राहणार नाही.

५) एका कामासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास तसेच ब्रिकेटसचा समान दर आल्यास पात्र संस्थेस सोडत पध्दतीने काम देणेत येईल.

६) स्मशानभूमीमध्ये ब्रिकेटस विक्रीकरिता देणेत आलेली परवानगी १ वर्षाकरिता राहिल.

७) पात्र नियुक्त संस्थांना काम सुरु करणेपुर्वी अनामत रक्कम रु. १०००००/- भरावी लागेल.

८) ब्रिकेटस साठा करणेची व्यवस्था संस्थेनी स्वखर्चाने करावी लागेल.

९) मंजुर दराप्रमाणे वापरणेत आलेल्या ब्रिकेटसची रितसर पावती मृतांच्या नातेवाईकास द्यावी लागेल.

१०) संस्था तयार करत असलेले ब्रिकेटस / अथवा पुरवठा केलेली कागदपत्रे सादर करावीत.

११) अंत्यविधी करिता लागणारे ब्रिकेटस चे वजन व त्याचा दर नमुद करावा तसेच ब्रिकेटस व्यतिरिक्त लागणारे साहित्य याची माहिती देणेत यावी.

१२) सदर कामकाजाकरिता आवश्यक शासकिय परवाने घेणेची जबाबदारी संस्थेची राहील.

१३) ब्रिकेटस विक्री व्यतीरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही.

१४) अटियुक्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

उपरोक्त अटींची पुर्तता करणारे संस्थानी १५ दिवसाचे आत पात्रतेबाबतचे कागदपत्रांसह इकडील कार्यालयात अर्ज सादर करावा.प्राप्त अर्जांची छाननी करुन काम देणे अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८ यांचा निर्णय अंतिम राहिल.

17/06/22

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

जाहिरात क्र.
क्र.आरोग्य/२/कावि/९४८/२०२२ दि.१७/०६/२०२२